ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

ISSN - 2277 - 5730
Volume - IX, Issue – II, April - June - 2020

Impact Factor 2019 - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. अलका अनिल मानकर

In Recognition of the Publication of the Paper Titled

म. गांधी तंटामुक्त मोहीम काळाची गरज

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com,
www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - II
April - June - 2020

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Marathi Part - I



Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | नागपूर जिल्हयातील वास्तव्याला असलेले आदिवासी स्त्रियांची जिवनशैली व त्यांची व्यवसाय विषयक समस्यांचा संशोधनात्मक अभ्यास: एक अध्ययन<br>**डॉ. अलका रामभाऊ कोटमकर** | १३९-१४२ |
| २८ | विदर्भातील दंडार लोकनाट्य : परंपरा<br>**डॉ. विशाखा संजय कांबळे** | १४३-१५४ |
| २९ | **म. गांधी तंटामुक्त मोहीम काळाची गरज**<br>**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर** | १५५-१५९ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २९. म. गांधी तंटामुक्त मोहीम काळाची गरज

**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर**
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा (रेल्वे), जि. बुलडाणा.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृती थोर आहे. इथे सदैव ऋषी-मुनी, संन्यासी, अवतारी पुरुष, आचार्य यांची थोर परंपरा राहिली आहे. म्हणूनच ही पुण्यभूमी आहे. जेव्हा जेव्हा समाजाची स्थिती बिघडली, नैतिक मूल्याचा ऱ्हास झाला, तेव्हा तेव्हा संन्यासी, साधुसंतांनी प्रत्यक्षरित्या कार्य करुन अध:पतन झालेल्या मानव समाजाला सारले. धर्माचे मूळ, दया, क्षमा, शांती, प्रेम, परोपकार, बंधुत्व, समता इ. संतांच्या शिकवणुकीमुळे भारतीय समाज सुख, समाधान, शांतीने नांदू लागला. पण जसा जसा मानव भौतिक क्षेत्रात प्रगती करु लागला आणि त्यातच आपले सर्वस्व मानू लागला तस तशी त्याची आत्मिक शांती नष्ट होऊ लागली. ऐहिक सुखालाच जास्त महत्व देऊन नैतिक मूल्यांना विसरत चालला, अशावेळी अवनती झालेल्या समाजाला पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या संतांच्या अभंगातून, ग्रंथातून, किर्तनातून, भाषणातून बहुमोल उपदेशाचे, शिकवणुकीचे मार्गदर्शन लाभत आले. भारतीय संस्कृतीची ही परंपरा आजतागायत सुरु आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

"गाव हा विश्वाचा नकाशा
गावावरुन देशाची परीक्षा
गावची भंगता, अवदशा येईल देशा ||"

माणूस जन्माला येतो तेव्हा तो निष्पाप, निरागस बाळ असतो. पण मृत्युचे वेळी तो आपले पापाचे ओझे घेऊन जातो. लहान मुलांसारखे निष्पाप, निरागस मन हे मरेपर्यंत टिकण्यास माणूस असमर्थ का ठरतो? का आज माणसातला माणूस हरवत चालला आहे? "गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी" असे म्हणण्याची पाळी आज आली आहे. याचा विचार करणे भाग आहे. स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे,

"Men-men these are wanted ! Everything else will be ready but strong, vigorous, believing young man sincere to the back-bone are wanted."

समाजातील जातीयवाद नष्ट होण्यास महापुरुषांनी तहहयात लढा दिला. पण आजही जातीव्यवस्थेच्या नावावर हा समाज विभागलेला दिसून येतो. सर्वत्र जातीचा बोलबाला दिसून येतो. जातीच्या नावावर एखाद्या परिवाराला जीवंत जाळल्या जाते, तर कधी गावठाणावरुन धिंड काढला जाते. कधी एखाद्याच्या कपाळावर

जातीचा शिक्का मारला जातो, तर कधी पाठीवर डाग दिले जातात. संपूर्ण देशात पसरलेल्या जातीव्यवस्थेमुळे विषमतावादी मानसिकतेमुळे अराजकता वाढली आहे.

अनेक थोर पुरुषांनी आपल्या साहित्यातून तत्कालिन समाजाला योग्य दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. साने गुरुजी यांनी "श्यामची आई", "भारतीय संस्कृती" यासारख्या पुस्तकातून मोलाचे विचार व्यक्त केले. संत तुकाराम महाराजांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे,

ईशे केले नाही । तुजसाठी सर्व ।
करु नको गर्व । प्राण्यांमध्ये ॥
देह देऊनिया । बुध्दीमान केला ।
धर्मापण दिला । सर्वांमध्ये ॥
जगाच्या कल्याणा । देह कष्टवला ।
कारणी लावला । सत्यासाठी ॥

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी "या भारतात बंधूभाव नित्य वसू दे" या गीतातून राष्ट्रीय एकात्मतेची, "अग्नी भडकला युध्दाचा अन् तू आळशी होऊन बसे" या भजनातून देशभक्ती यांची जाणिव करुन दिली. म. गांधींनी सत्य, अहिंसेचा नारा देऊन समाज जगविला, डॉ. आंबेडकरांनी दलितांना शिका, संघटीत व्हा सांगितले. आज आपण स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर एक राष्ट्र, एक संस्कृती म्हणून एका अर्थपूर्ण व निर्णायक वळणावर आहोत. गुन्हेगारी, देशद्रोह, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, विषमता इ. घटक प्रबळ होत गेले, तर आपण एक राष्ट्र, एक संस्कृती म्हणून नष्ट होऊ. आज १०० कोटी मानवतेच्या उत्थानासाठी गरज आहे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कर्तव्य करणाऱ्या नागरिकांची, मानवी सन्मान व आत्मविश्वास असलेल्या नरसिंहाची, लोकांचे अश्रू पुसणाऱ्या बुध्दाची आणि म्हणूनच नुकत्यांच संपन्न झालेल्या ६० व्या स्वातंत्र्य दिनाचा मुहूर्त गाठून मा. उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी "तंटामुक्त गाव योजना" जाहीर करुन आपल्या संवेदनशिलतेचे दर्शन दिले. प्रत्येक गांव गुण्यागोविंदाने नांदावे, तंटेबखेडे नष्ट होऊन सामाजिक सलोखा निर्माण व्हावा हाच खरा त्यामागचा उद्देश.

**गावपातळीवर भांडण, तंटे निर्माण होण्याची कारणे**

१) स्थानिक पातळीवरील राजकारण, मान अपमान यामुळे भांडण व मारामाऱ्यांचे प्रमाण वाढून गुन्ह्याची नोंद होत आहे. अशा दाव्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढून खटले प्रलंबित राहत आहेत. गावपातळीवर छोट्या-छोट्या कारणांवरुन निर्माण झालेला तंटा मोठे स्वरुप धारण करतो. छोट्या कारणावरुन निर्माण झालेला तंटा मोठा होऊन पुढे फौजदारी बनतो व त्यातून अनेक कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येते.

२) अनैतिक संबंध, भाऊबंधकी, शेतीचे वाद, सग्यासोयऱ्यांचे झालेले खून, वाटणी हिस्से व धुऱ्याबंधाऱ्यावरुन उद्‌भवलेले वाद आणि अशा प्रकारचे वाद सोडविण्यास झालेला विलंब.

३) गावगाड्यापर्यंत पोहोचलेल्या राजकारणात शब्द फिरविणाऱ्यांची भाऊगर्दी, बेरोजगार तरुणांच्या गावागावातून फिरणाऱ्या फौजा व त्यांचा उपयोग करुन गावागावात गटबाजी निर्माण करणारी राजकीय मंडळी.

४) हल्लीच्या काळात समाजात परिवर्तन घडून आले. प्रत्येक व्यक्ती भौतिक सुखाकडे वळली, तिला संस्कृतीची जाणिव राहिली नाही. सर्वधर्मसहिष्णुतेला अर्थ उरला नाही. समाजात संघर्ष, भ्रष्टाचार, जातीद्वेष, व्यभिचार वाढत चालला. एकमेकांबद्दल सौजन्य उरले नाही. धर्म, जात, भाषा, प्रांत यातील भेद तीव्र होत आहेत.

५) आज समाजाप्रतीची जागरुकता नष्ट झालेली दिसून येते. समाजाशी माझे काहीही घेणे देणे नाही असा विचार करण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे.

६) आम्ही ऋषीमुनींचे वंशज आहोत, महावीर, बुध्दाच्या देशातील आहोत. पण आमच्या गावोगावी हिंसा भडकत आहे, जाळपोळ, लुटालुट होत आहे. "अहिंसा परमो धर्म" ऐवजी "हिंसा परमो कर्म" झाले आहे. "बहुजनहिताय । बहुजनसुखायां" ऐवजी "स्वजनहिताय । स्वजनसुखाय ।" सर्वत्र दिसून येते.

**तंटामुक्त गाव मोहीमेची गरज**

गावपातळीवर लोकसहभागातून प्रचंड मोठे काम संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानामुळे आणि हागणदारी मुक्त गांव योजनेतून झाले आहे. या योजनेच्या यशामुळे राज्यातील गावागावात लोकसहभागातून ४५० कोटी रुपयांची विविध कामे झाली. त्यामुळेच केंद्र शासनाने या योजनेचे निर्मल ग्राम योजना असे नामकरण करुन संपूर्ण देशात ही योजना राबविली. या यशाच्या पार्श्वभूमीवरच म. गांधी यांच्या स्वप्नातील ग्रामराज्य यावे यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरु होत आहे. त्यासाठी गावपातळीवर ८६६ ग्रामपंचायत अंतर्गत समित्या गठीत करण्यात येत आहेत. बुलडाणा जिल्ह्यात २७ पोलीस स्टेशन अंतर्गत ७४६ समित्या गठीत होत आहेत. अभियानाचा उद्देश सफल होण्यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्यास तंटामुक्ती ही शांततेची शक्ती ठरु शकते, एवढे निश्चित.

गावागावातील तंटे मिटविण्यासाठी लोकन्यायालयासारखी पर्यायी व्यवस्था उपलब्ध असली तरीही तंटे निर्माण होऊ नयेत व निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच लोकसहभागातून, सौहार्दपूर्ण व सलोख्याचे वातावरण निर्माण होऊन सोडविण्यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम राज्यशासनाच्या वतीने सुरु करण्यात आली असून राजकारण व पक्षपात विरहीत पध्दतीने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. गावपातळीवर लहानसहान कारणांवरुन निर्माण होणाऱ्या तंट्याचे पर्यावसान मोठ्या तंट्यात होऊ न देता कुटुंबाची, समाजाची, गावाची

शांतता धोक्यात येऊ नये याकरीता ग्रामपातळीवर तंटामुक्त मोहिम राबविण्याची गरज आहे. गांव पातळीवर निर्माण होणारे तंटे लोकसहभागाने, सामोपचाराने व आवश्यक त्या ठिकाणी प्रशासनाची मदत घेऊन सोडविण्याचा प्रयत्न केल्यास गावहिताचे ठरेल. यासाठी ही योजना राबवितांना काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) ही योजना राबवितांना तंटे आणि तणाव निर्माण होण्याची प्रमुख कारणे शोधून त्यासंबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे व प्रबोधन करणे, ग्राम संबोधन करणे, ग्राम संरक्षण, मालमत्ताचे संरक्षण, सामाजिक सुरक्षितता आदी उपक्रम हाती घेऊन लोकांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

२) सार्वजनिक सण व उत्सव शांततेने साजरे करणे. यामध्ये जयंती, उत्सव, गणेशोत्सव साजरे करतांना अनावश्यक बाबीवर खर्च करण्यापेक्षा शिबीर, सौहार्दपूर्ण व सलोख्याचे संबंध वाढविणारे उपक्रम यांची भर असावी. 'एक गाव एक गणपती' सारखे उपक्रम पोलीस बंदोबस्ताशिवाय साजरे करावेत.

३) जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी एकत्रित सण व उत्सव साजरे करणे, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणे, मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांच्या तक्रारी मिटवून जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे.

४) संतमहात्म्यांच्या मते मानव सुसंस्कारीत असावा. संस्कारक्षम मनुष्य स्वत:पेक्षा इतरांच्या सुखाचा, कल्याणाचा विचार करतो. तो कुटुंबियांशी समाजबांधवांशी प्रेमाने वागतो. अशा सुसंस्कृत नागरीकांच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

५) गावातील पुतळे व प्रार्थना स्थळे यांच्या देशभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करावी. खाजगी व सार्वजनिक मालमत्तांचे संरक्षण करुन विद्रुपीकरण रोखण्यास निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियम व अंमलबजावणी करावी.

६) गावात अवैध धंदे व त्यामुळे निर्माण होणारी कुप्रवृत्ती यांचे निर्मूलन करण्यास अवैध धंदे बंद करुन त्यांच्यासाठी रोजगाराला प्रयत्न करणे.

७) व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे, समाजात असलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा यांना आळा घालून समाजात जनजागृतीची मोहीम हाती घेणे.

८) सामुहिक विवाह सोहळे आयोजित करुन बालविवाह सारख्या प्रथा बंद करण्याचे प्रयत्न करणे.

९) ग्रामपंचायत, ग्रामपतपेढ्या, विविध कार्यकारी सोसायट्या यांच्या निवडणुका बिनविरोध करुन पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत करुन राजकीय सामंजस्य निर्माण करणे.

१०) खाजगी, सार्वजनिक सण समारंभ साजरे करतांना ध्वनिक्षेपकांचा नियमानुसार व मर्यादीत वापर करुन गैरप्रकारांना प्रतिबंध असावा.

११) Man is a social animal मानव हा समाजात राहणारा प्राणी आहे, मानव समाजाकडून बरेच काही शिकतो. त्यासाठी चांगल्या संस्काराची बिंबवणूक होऊन कुसंस्कार पुढे येणार नाहीत त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

१२) समाज एकसंघ राहण्यासाठी माणसामाणसातील भेद नष्ट झाले पाहिजेत. माणसाने माणसाशी माणूस म्हणून वागले पाहिजे. मानवात नवे रक्त ओतून त्यात नवा जोम, नवी चेतना निर्माण केली पाहिजे. तरच मानवतेची सुंदर बाग निर्माण होईल. म्हणूनच,

"वर्णाचा, धर्माचा, या देशाचा भेद नसे माणसा माणसाचा,
विश्वातल्या साऱ्या जीवांचा, हा मैत्रिचा भाव कायम इथे" असे म्हणता येईल.

१३) प्रत्येकाने गुणी बनावे आणि गुणांचा उपयोग समाजासाठी करावा. माणुसकी, श्रमनिष्ठा, समता याचा साक्षात्कार सर्वांना व्हावा, हेच कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी आपल्या गीतात व्यक्त करतांना म्हटले आहे,

"माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो ।
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतो ॥
हे विश्वची घर आमुचे, मंत्र हा महान ।
ज्ञान बनो कर्मशिल, कर्म ज्ञानवान....॥"

१४) सुसंघटित समाज व राष्ट्रीय एकता निर्माण होण्यास स्वातंत्र्य, समता, बंधुता, समन्याय, राष्ट्रभक्ती इ. संस्कार निर्माण होण्यासाठी प्रयत्न व्हावेत आपला समाज, आपला देश, आपली भाषा व संस्कृतीचा अभिमान वाटावा असे संस्कार होणे म्हणजे ग.दि. माडगुळकरांच्या शब्दांत,

"या भारतात माझ्या बहुसाल, धर्म जाती, गुंफी अनेकतेला ऐक्यात देशभक्ती ।
जो देशभक्त तो तो मज वंदनीय आहे, जो भारतीय तो तो माझा स्वकीय आहे.
मी भारतीय आहे । मी भारतीय आहे ।"

ह्या उपाययोजनेद्वारे समाजातील कलह, जातीभेद, कुटुंबातील ताणतणाव नष्ट करता येईल. कुटुंब, समाज व देश यात एकसंघता साधता येईल.

**जयहिंद ......!** **जयहिंद....!** **जयहिंद.....!**

IMPACT FACTOR 6.014

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XVII, Vol. - V**
Year-IX, Bi-Annual(Half Yearly)
**(June 2019 To Nov. 2019)**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

**Price : ₹ 200/-**

CHIEF EDITOR

**Dr. Balaji G. Kamble**
Professor & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

SPECIAL EDITOR

**Dr. E. Sivanagi Reddy**
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

EXECUTIVE EDITORS

**Dr. Sachin Napate**
Pune, Dist. Pune. M.S.

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
&Cultural Studies, University of Berlin.
Berlin. (Jermany)

**Michael Strayss,**
Director.
International Relation & Diplomacy.
Schiller International University.
Paris. (France)

**Dr. Deelip S. Arjune**
Professor, Head, Dept. of History
J.E.S. Mahavidyalaya.
Jalna. Dist. Jalna (M.S.)

**Dr. Nilam Chhangani**
Dept. of Economics.
S.K.N.G. College,
Karanja Lad. Dist. Sashim(M.S.)

**Dr. Rajendra R. Gawhale**
Head, Dept. of Economics.
G.S. College.
Khamgaon. Dist. Buldana (M.S.)

DEPUTY EDITORS

**Dr. Rajendra Ganapure**
Professor Head, Dept. of Economics.
S. M. P. Mahavidyalaya,
Murum. Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. B. K. Shinde**
Professor, Head, Dept. of Economics.
D.S.M. Mahavidyalaya.
Jintur, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. Vijay R. Gawhale**
Head, Dept. of Commerce.
G.S. Mahavidyalaya.
Khamgaon, Dist. Buldana(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

**Dr. Mahadeo S. Kamble**
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**Dr. S. R. Patil**
Professor, Dept. of Economics.
Swami Vivekanand Mahavidyalaya.
Shirur Tajband. Dist. Latur(M.S.)

CO- EDITORS

**Dr. Allabaksha Jamadar**
Professor, Head, Dept. of Hindi,
B.K.D. College.
Chakur. Dist. Latur (M.S.)

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya.
Bansarola. Dist. Beed (M.S.)

**Dr. Shyam Khandare**
Dept. of Sociology
Gondawana University,
Gadchiroli. Dist. Gadchiroli (M.S.)

**Dr. M. Veeraprasad**
Dept. of Political Science.
S.K. University,
Anantpur. Dist. Anantpur (A.P.)